महामार्ग पोलीस तक्रार निवारण
समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग
आदेश क्र. टिआरए 0809/प्र.क्र.232/पोल-८,
मंत्रालय, मुंबई - 400032
दिनांक. 12 ऑगस्ट, 2009

1.आदेशः राज्यातील महामार्गावरील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी तसेच अपघातातील अपघातग्रस्तांना ताबडतोब औषधोपचाराची सोये उपलब्ध होण्याच्या दृष्टिने मदत करणे, अपघाताबाबत संबंधित पोलीस ठाण्याला माहिती देणे, अपघात करुन पळून गेलेल्या वाहनांचा शोध लावून दोषी वाहन चालकास पकडण्यासाठी मदत करणे, महामार्गावर चांगली सुरक्षितता प्रदान दरणे, प्रवाशांना मार्गावरील जवळच्या पेट्रोल पंप, दवाखाना, पोलीस ठाणे व विश्रामगृह वगैरे सारखी स्थानिक माहिती देणे, नांदुरुस्त होऊन बंद पडलेल्या वाहनांच्या बाबतीत योग्य ती कार्यवाही व मदत करणे, महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तिच्या प्रवासांच्या वेळी रस्त्यावरील रस्त्यावरील वाहतूक हरळीत व सुरक्षित ठेवणे इत्यादी कामांसाठी महामार्ग वाहतूक पोलीस शाखा निर्माण करण्यात आली आहे. सदर कामांच्या अनुषंगाने जनतेच्या / वाहन चालक-मालकांच्या काही तक्रारी सल्यास त्यांचे निवारण करण्यासाठी खालीलप्रमाणे तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येत साहे

| | |
|---|---|
| अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य | - अध्यक्ष |
| सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई | - सदस्य |
| परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य | - सदस्य |
| मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | - सदस्य |
| मुख्य अभियंता इंडियन रोड बिल्डर्स (I.R.B.) | - सदस्य |
| सह सचिव व मुख्य अभियंता सार्वजनिक | - सदस्य |
| बांधकाम विभाग, मंत्रालय. | - सदस्य |
| सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय | - सदस्य |
| पोलीस अधिक्षक, वाहतूक (मुख्यालय), मुंबई | - सदस्य सचिव |

2. वरील कायमस्वरुपी सदस्यांव्यतिरिक्त सदर समितीच्या बैठकीच्या वेळी वेळी संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निमंत्रित करण्यात यावे. त्याचबरोबर समितीला आवश्यक वाटल्यास समितीने स्वेच्छेनुसार ट्रक / टॅक्सी युनियनच्या किंवा प्रख्यात वाहतूक संघटनेच्या प्रतिनिधीला बोलवावे

3. वरील समिती दर महिन्याच्या महिन्याच्या दुस-या मंगळवारी त्यांच्याकड आलेल्या तक्रारींचे निवारण करील. तसेच, मोटार वाहन कायद्याची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचर्णीचा ऊहापोह करुन त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना सुचवेल.

4. मोटार वाहन कायदा नियमांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी परिवहन आयुक्त व अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी कार्यवाही करावी.

(शि.म. धुळे)
कार्यासन अधिकारी,
गृह विभाग, महाराष्ट्र शासन.